मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८७ वा ● सोमवार, ता. ०५ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## व्हेनेझुएला हल्ल्याचा जगभर निषेध

### युनोची आज तातडीची बैठक

**जिनेव्हा । रयत समाचार**



व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्ल्याचा तसेच राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकेत ताब्यात घेण्यात आल्याच्या घटनेचा जगभरातून तीव्र निषेध होत आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची तातडीची विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. संपूर्ण युरोप तसेच अमेरिकेतच या कारवाईविरोधात वाढता विरोध दिसून येत असून, त्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. सुरक्षा परिषदेतील बैठकीत अमेरिकेला किती देशांचा पाठिंबा मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या सुरक्षा परिषदेत पाच कायमस्वरूपी (व्हेटो अधिकार असलेले) सदस्यांसह एकूण १५ सदस्य देश आहेत. भारत सध्या सुरक्षा परिषदेचा सदस्य नाही. मिळालेल्या माहितीनुसार, या बैठकीत व्हेनेझुएलावरील अमेरिकेचा हल्ला तसेच राष्ट्राध्यक्ष मादुरो यांचे अपहरण व ताब्यात ठेवण्याच्या घटनेवर सविस्तर चर्चा होणार आहे. अमेरिकन प्रशासनालाही आपल्या मित्र राष्ट्रांकडून इतका तीव्र विरोध होईल, याची अपेक्षा नव्हती, असे राजनैतिक वर्तुळात बोलले जात आहे. अनेक नाटो सदस्य देशांनीही या हल्ल्याबाबत उघडपणे असहमती दर्शविली आहे. रशिया, चीन, ब्राझील, इराण, क्युबा, बोलिव्हिया, चिली, कोलंबिया आणि स्पेनसह अनेक देशांनी या कारवाईवर तीव्र टीका केली आहे. जगातील बहुसंख्य देशांनी या हल्ल्याला स्पष्ट विरोध दर्शविल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेविरोधात एकजूट दिसून येत आहे. दरम्यान, अमेरिकेच्या हल्ल्याबाबत किंवा राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या अपहरणाच्या घटनेवर भारताकडून अद्याप ठोस प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात व्हेनेझुएलातील अलीकडील घडामोडी अत्यंत चिंताजनक असल्याचे नमूद करत परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे स्पष्ट केले आहे. व्हेनेझुएलातील नागरिकांच्या कल्याणासाठी व सुरक्षिततेसाठी भारत आपला पाठिंबा पुन्हा व्यक्त करत असून, या प्रदेशात शांतता व स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी सर्व संबंधित पक्षांनी संवादाच्या माध्यमातून शांततापूर्ण तोडगा काढावा, असे आवाहन भारताने केले आहे.

## शतक महोत्सवी मराठी साहित्य संमेलन पुण्यात

**सातारा । रयत समाचार**

पुढील वर्षी होणारे शतक महोत्सवी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी रविवारी केली. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी बोलताना जोशी यांनी राजकारण्यांनी साहित्य क्षेत्रात हस्तक्षेप करू नये, तसेच मराठी भाषेची सक्ती असावी, याचा पुनरुच्चार केला. शतक महोत्सवी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दुबई येथे विशेष विश्व साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. दरम्यान, शतक महोत्सवी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने होणाऱ्या पुढील संमेलनात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या सर्व माजी अध्यक्षांना महादजी शिंदे यांच्या नावे प्रत्येकी एक लाख रुपयांचा सन्मान निधी देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे भाषा विकास मंत्री उदय सामंत यांनी व्यासपीठावरून केली. तसेच संमेलनासाठी ग. दि. माडगुळकर यांच्या नावेही स्वतंत्र निधी जाहीर करण्यात आला. यावेळी साहित्य परिषदेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी सहा वर्षांपूर्वी मंजूर करण्यात आलेल्या ५० लाख रुपयांच्या निधीत भर घालून एकूण एक कोटी रुपयांचा धनादेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# ‘स्वाभिमान निधी’, प्रत्येक वार्डात ‘आजी-आजोबा मैदान’

### ठाकरे बंधूंचा वचननामा जाहीर

**मुंबई । रयत समाचार**



मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही पक्षांचा एकत्रित वचननामा जाहीर केला. या वचननाम्यात मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या सामाजिक, आर्थिक व नागरी सुविधा देण्याची आश्वासने देण्यात आली आहेत.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी वचननाम्यातील सर्व घोषणा पूर्ण करण्याची ग्वाही दिली.. या वचननाम्यातील प्रमुख घोषणेनुसार, ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांची युती महापालिकेत सत्तेत आल्यास मुंबई महापालिका हद्दीतील घरकाम करणाऱ्या महिलांची नोंदणी करून त्यांना दरमहा १५०० रुपये ‘स्वाभिमान निधी’ देण्यात येणार आहे. तसेच मुंबईकरांसाठी १० रुपयांत जेवण व नाश्ता उपलब्ध करून देण्याची योजनाही राबविण्यात येणार आहे. महिलांसाठी विशेष सुविधा देताना नोकरदार, पालक तसेच कष्टकरी महिलांसाठी पाळणाघरे सुरू करण्यात येतील, तर पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र दवाखाने उभारले जाणार आहेत. रोजगारनिर्मितीसाठी बाळासाहेब ठाकरे स्वयंरोजगार अर्थसहाय्य योजना राबवली जाणार असून, महापालिकेतील अत्यावश्यक रिक्त पदे भरण्यात येतील.

प्रत्येक वार्डात ‘आजी-आजोबा मैदान’ उभारण्याचाही वचननाम्यात समावेश आहे. नागरी करांच्या बाबतीत ७०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्यात येणार असून कचरा कर रद्द केला जाणार आहे. महापालिकेच्या शाळा खासगी बिल्डरांच्या ताब्यात जाऊ दिल्या जाणार नाहीत, तसेच दहावीनंतर महापालिका शाळांमध्ये बारावीपर्यंत ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यात येणार आहेत. मुंबई पब्लिक स्कूलचा दर्जा अत्याधुनिक केला जाणार असून मराठी शाळांसाठी ‘बोलतो मराठी’ हा डिजिटल उपक्रम सुरू करण्यात येणार आहे. शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात मुंबई महानगरपालिकेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने शहरातील सर्वात मोठे ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. आरोग्य सुविधांमध्ये सुपर स्पेशालिस्ट कॅन्सर रुग्णालय तसेच रॅपिड बाईक मेडिकल असिस्टंट ॲम्ब्युलन्स सेवा सुरू केली जाणार आहे. रस्त्यांच्या बाबतीत उत्तम दर्जाचे रस्ते तयार करून कंत्राटदारांकडून १५ वर्षांची हमी घेतली जाणार आहे. पाणी व पर्यावरण विषयक योजनांमध्ये सांडपाणी प्रक्रिया व मलनिसारण प्रकल्प उभारले जाणार असून पाण्याचे दर स्थिर ठेवत मुंबईकरांना नियमित पाणीपुरवठा केला जाणार आहे. समुद्राचे पाणी गोड्या पाण्यात रूपांतरित करण्याचा प्रकल्प राबवला जाणार आहे.

नालेसफाईची प्रक्रिया वर्षभर राबविण्यात येणार आहे. वाहतूक व दैनंदिन सोयीसुविधांमध्ये बेस्टचा प्रवास परवडणारा करण्यात येणार असून महिला व विद्यार्थ्यांसाठी बेस्ट बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येणार आहे. महापालिकेच्या पार्किंगमध्ये मोफत पार्किंगची व्यवस्था करण्यात येईल, तसेच प्रत्येक वार्डात मिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार आहे. याशिवाय मुंबईकरांना दरमहा १०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची घोषणाही वचननाम्यात करण्यात आली आहे.



## ‘युनिटी मॉल’विरोधात जनआंदोलन सुरू

### राजकीय पक्षांसह पर्यावरणप्रेमींचा पाठिंबा

**पणजी । रयत समाचार**

चिंबल येथील तोयार तलाव परिसरात प्रस्तावित असलेला ‘युनिटी मॉल’ व ‘प्रशासन स्तंभ’ प्रकल्प पूर्णपणे रद्द होईपर्यंत साखळी उपोषण व आंदोलन सुरूच ठेवण्याचा ठराव रविवारी झालेल्या जाहीर सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. या प्रकल्पाविरोधात चिंबल ग्रामस्थांनी पुकारलेल्या आंदोलनाला काँग्रेस, रिव्होल्युशनरी गोवन्स (आरजी), आम आदमी पार्टी (आप) यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमींनी जाहीर पाठिंबा दर्शविला. गेल्या २८ डिसेंबरपासून तोयार तलावाच्या संवर्धनासाठी आणि प्रस्तावित ‘युनिटी मॉल’च्या विरोधात ग्रामस्थांचे उपोषण सुरू आहे. रविवारी सकाळी उपोषणस्थळी झालेल्या सभेत ‘युनिटी मॉल नको’ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी पर्यटन महामंडळ (GTDC) व नगर नियोजन (TCP) खात्यांकडे धडक देऊन निवेदने सादर करण्याचा तसेच गोव्यातील इतर स्थानिक आंदोलनांना पाठिंबा देण्याचा ठराव संमत करण्यात आला. सभेत बोलताना काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते युरी आलेमाव यांनी सरकारवर जोरदार टीका केली. भाजप सरकार दिल्लीतील मोठ्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी गोव्याचे पर्यावरण, संस्कृती व जमीन विकायला निघाले असल्याचा आरोप त्यांनी केला. म्हादईनंतर आता तलाव व डोंगर उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगत, या लढ्यात काँग्रेस ग्रामस्थांच्या पाठीशी ठाम उभी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार विरेश बोरकर यांनीही या प्रकल्पाला विधानसभेत विरोध केल्याची माहिती दिली. या जाहीर सभेला आमदार ॲड. कार्लुस फेरेरा, ॲड. अमित पालेकर, पर्यावरणवादी रमेश गावस, सामाजिक कार्यकर्ते शंकर पोळजी, अल्बेर्टिना आल्मेदा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आंदोलनामुळे चिंबल परिसरात वातावरण तापले असून, प्रकल्प रद्द झाल्याशिवाय माघार न घेण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## सशुल्क शनिदर्शन बंद करण्याची मागणी

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनिभक्तांसाठी चौथऱ्यावर जाऊन आकारण्यात येणारे ५०० रुपयांचे पेड दर्शन बंद करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सोपान बाबासाहेब रावडे यांनी देवस्थान प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागणी मान्य न झाल्यास २६ जानेवारी रोजी उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम यांना दिलेल्या निवेदनात रावडे यांनी म्हटले आहे की, देश-विदेशातून लाखो भाविक दर्शनासाठी शनिशिंगणापूर येथे येतात. त्यांच्या सूचना, तक्रारी व समस्यांसाठी देवस्थान कार्यालयात कायमस्वरूपी, जबाबदार व सक्षम अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे, तसेच तो अधिकारी तेथे वास्तव्यास असावा, जेणेकरून भाविकांशी थेट संवाद साधता येईल. पेड दर्शन ही व्यवस्था भेदभाव करणारी व अन्यायकारक असून, या माध्यमातून भाविकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पेड दर्शन तात्काळ बंद न केल्यास २६ जानेवारी रोजी उपोषण करण्याचा निर्धार निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.

# व्हेनेझुएला: अमेरिकन हडेलहप्पीचा विकृत चेहरा!





**प्रभाकर ढगे**
९३७३०२१५८४
समुह संपादक,
रयत समाचार, पणजी, गोवा.

**प्रासंगिक**

कुविख्यात लिंगपिसाट गुन्हेगार जेफ्री एपस्टाईन याने जगभरातील रंगेल राजकारण्यांच्या अश्लिल व्हिडिओ चित्रफिती बनवल्या. त्या उघड करण्याची मजबुरी अमेरिकन सरकारवर आली आणि त्यात दस्तुरखुद्द राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पचे विकृत चाळेही जगजाहीर झाले. या आंतरराष्ट्रीय नाचक्कीतून बाहेर येण्यासाठी वाह्यात डोनाल्ड ट्रम्पला काहीतरी उचापती हव्याच होत्या. ती कसर भरून काढण्यासाठी आणि अमेरिकेची पारंपरिक दादागिरीची परंपरा पुढे चालविण्यासाठी ट्रम्पला व्हेनेझुएलावर हल्ला हे एक कारण सापडले. गेली अनेक महिने अमेरिकन नौदल आणि हवाई दल व्हेनेझुएलाची जहाजे नष्ट करण्याच्या कामगिरीवर होतेच. वेनेझुएलातील ड्रग्समुळे अमेरिकन तरुण पिढी बरबाद होत आहे, असे कारण देत सुमारे १५० लढाऊ विमानाद्वारे हल्ला करत ट्रम्पने व्हेनेझुएलाचे हुकूमशहा राष्ट्रपती निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला युध्दकैदी बनवून अमेरिकेत आणले आहे. संयुक्त राष्ट्र संघाला आणि आंतरराष्ट्रीय नियमांना खिजगणतीतही न धरता डोनाल्ड ट्रम्पने ही कारवाई केली. व्हेनेझुएलावरील या कारावाईनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व जगाला गुंडासारखी धमकी दिली, ‘‘आपल्याशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही‘‘: ट्रम्प यांची पत्रकार परिषद, की जगाला साम्राज्यवादी आव्हान? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला असून अमेरिकेसह जगभरातील लोकशाहीवादी नागरिक ट्रम्पच्या या हडेलहप्पीचा तीव्र निषेध करीत आहेत. व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्याचे समर्थन करण्यासाठी ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेतली आणि म्हणाले, ‘‘आम्ही व्हेनेझुएलातील समाजवादी राजवट संपवली आहे. ते आता अमेरिकेच्या नियंत्रणाखाली राहील. आम्ही आमच्या तेल कंपन्या तिथे पाठवू आणि तिथे तेल विकू. आता कोणीही आमच्याशी स्पर्धा करू शकत नाही. आमच्याकडे जगातील सर्वोत्तम शस्त्रे आहेत. इतर देशांनी हे समजून घेतले पाहिजे आणि कोणताही देश आता अमेरिकेला आव्हान देऊ शकत नाही. मादुरो आणि त्यांची पत्नी न्यूयॉर्कमध्ये आमच्या ताब्यात आहेत. ते हुकूमशहा आहेत आणि आम्ही त्यांना न्याय मिळवून देऊ.‘‘ साम्राज्यवादी अमेरिकेचा बेलगाम हुकूमशहा डोनाल्ड ट्रम्प व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्याचे असे निलाजरे समर्थन करत आहे. या आधी व्हिएतनाम, लिबिया, अफगाणिस्तान, इराक या देशावर हल्ले करताना अमेरिकेने असाचा कांगावा केला होता. व्हेनेझुएलातील ड्रग्स ही अमेरिकेची वरवरची सबब आहे. व्हेनेझुएलाचे तेलसाठे ताब्यात घेणे हा खरा डाव आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर, आता हे स्पष्ट झाले आहे की अमेरिकन सैन्याने लॅटिन अमेरिकन देश व्हेनेझुएलावर रात्रीच्या वेळी इतका मोठा हल्ला केला होता, तो केवळ घृणास्पद आणि बेकायदेशीर घुसखोरी करण्यासाठीच होता. व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या पत्नीला ज्या पद्धतीने लष्करी नियंत्रणाखाली हातकड्या घालून अमेरिकेत आणण्यात आले ते केवळ आंतरराष्ट्रीय कायद्याचे आणि १९४५ च्या संयुक्त राष्ट्रांच्या सनदेचे उघड उल्लंघनच नाही तर मानवाधिकारांच्या किमान तत्त्वांनाही हरताळ फासणारे आहे. ट्रम्प प्रशासनाच्या या घृणास्पद कृतीचा अमेरिकेसह जगभरात विरोध होत आहे. व्हेनेझुएलावरील अमेरिकेच्या हल्ल्याविरुद्ध न्यूयॉर्क, पॅरिस आणि लंडनसह जगभरातील अनेक शहरांमध्ये निदर्शने झाली आहेत किंवा सुरू आहेत. भारतातही दिल्लीपासून विशाखापट्टणमपर्यंत अनेक शहरांमधून निदर्शने होत असल्याच्या बातम्या येत आहेत. या सर्व निषेध करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटना व्हेनेझुएलाचे पदच्युत अध्यक्ष निकोलस मादुरो यांचे समर्थक किंवा प्रशंसक नाहीत. परंतु ते निश्चितच या क्रूर कृतीविरुद्ध आहेत, जे अमेरिकन प्रशासनाच्या जागतिक वर्चस्व आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करते. निकोलस मादुरो हे हुकूमशहा आणि वोटचोर होते. व्हेनेझुएलातील जनतेला ते नको आहेत. गेली १२ वर्षे ते मनमानी कारभार करत आहेत. निकोलस मादुरो यांच्या हुकूमशाही विरोधात आंदोलन करणाऱ्या मारिया मचाडो यांना यंदाचा नोबेल पुरस्कार मिळाल्याने जगाचे लक्ष व्हेनेझुएलातील लोकशाही लढ्याकडे वेधले गेले आहे. मादुरो यांना सत्ताच्युत करण्याची जबाबदारी तेथील जनतेची आहे. ट्रम्पने तिथे नाक खुपसण्याची गरज नाही. पण अमेरिका अजूनही महासत्तेचा माज मिरवत आहे. अमेरिकन दादागिरीला जगभर विरोध होत आहे. रशिया, चीन, ब्राझील, इराण, कोलंबिया, मेक्सिको, बोलिव्हिया, क्युबा आणि चिली यासारख्या अनेक देशांमधून मोठ्या प्रमाणात निदर्शने होत असल्याने तसेच अमेरिकेतच विरोध होत असल्याने ट्रम्प प्रशासनाला वाढत्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तथापि, डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या अलोकतांत्रिक स्वभावासाठी आणि गुंडगिरीसाठी आधीच कुप्रसिद्ध आहेत. त्यामुळे या निदर्शनांचा त्यांच्यावर किती परिणाम होईल हे सांगणे कठीण आहे. स्पेनसारख्या युरोपीय देशांनीही अमेरिकेच्या हल्ल्याला नकार दिला आहे. इंग्लंड सरकारने कोणतेही महत्त्वपूर्ण विधान केलेले नसले तरी, ब्रिटनमध्येही राजकीय विरोध वाढत आहे. जग पुन्हा महायुध्दाच्या दिशेने नेण्याचे पाप अमेरिका करत आहे. भ्रष्टाचार आणि आर्थिक गुन्हे यात गळाभर रूतलेले डोनाल्ड ट्रम्प व्हेनेझुएलामध्ये थेट अमेरिकन राजवट स्थापन करण्याचे किंवा निवडून न आलेले कठपुतळी सरकार चालवण्याचे त्यांचे ध्येय साध्य करू शकतील का? की ते त्यांच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी माफिया उद्योजक मित्रांच्या इशाऱ्यावर नाचत आहेत? काही ठराविक लोकांनीच जगावर राज्य केले पाहिजे ही अघोरी इच्छा असलेल्या नेदरलँडमधील एका प्रबळ गटाचे ते प्यादे बनून या कारवाया करत आहेत का? व्हेनेझुएलावर झालेल्या या अमेरिकन दादागिरीला आळा घालण्यासाठी जगभरातील काही देश व्यूहनीती बनवणार का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी काही दिवस थांबावे लागेल.

## ऐतिहासिक मराठी मिशनच्या क्लेरा ब्रुस हायस्कूलचे संवर्धन गरजेचे- न्या.पैठणकर

### नीलिमा जाधव-बंडेलू यांचा वारसा सावित्रीचा पुरस्काराने गौरव

**अहमदनगर । रयत समाचार**



मानवाधिकार अभियान व उर्जिता सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा जपत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा जाधव बंडेलू यांना वारसा सावित्रीचा पुरस्कार देवून जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथील जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती योगेश पैठणकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मराठी मिशनच्या क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी मिशनच्या अध्यक्षा डॉ. विजया जाधव या उपस्थित होत्या, यावेळी व्यासपीठावर भारत सरकार, जीएसटी व कस्टम्स विभागाचे विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. सुभाष भोर, मानवाधिकार अभियानचे प्रदेशाध्यक्ष ॲड.संतोष गायकवाड, ऊर्जिता सोशल फाउंडेशनच्या संध्या मेढे, प्रा. सॅम्युएल वाघमारे, भैरवनाथ वाकळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथी न्यायमूर्ती योगेश पैठणकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे आणि आजच्या सामाजिक वास्तवाचे महत्त्व अधोरेखित केले. अनंत अडचणींवर मात करत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी देशात स्त्री शिक्षणाचा पाया रोवला, असे त्यांनी सांगितले. महात्मा फुले यांनी मिशनरी शाळेत शिक्षण घेतले होते. स्त्री शिक्षणाची गरज ओळखून त्यांनी सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण अहमदनगर येथील मराठी मिशनच्या क्लेरा ब्रुस येथे पूर्ण करून घेतले. त्यानंतर सावित्रीबाईंनी स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे सावित्रीबाईंचे प्रारंभीचे प्रशिक्षण ज्या ऐतिहासिक मराठी मिशनच्या क्लेरा ब्रुस हायस्कूलमध्ये झाले, त्या वास्तूचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष अतिथी ॲड. सुभाष भोर यांनी आपल्या मनोगतात नीलिमा जाधवबंडेलू यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा जपणाऱ्या महिलांचा पुरस्काराद्वारे सन्मान करणे हेच सावित्रीबाईंना खरे अभिवादन असल्याचे त्यांनी नमूद केले आणि या पुरस्कारासाठी मानवाधिकार अभियान व उर्जिता सोशल फाउंडेशनचे अभिनंदन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. विजया जाधव म्हणाल्या की, पुरस्कार ही खरी सुरुवात असून आता पुरस्कार मिळालेल्या नीलिमा ताईंनी अधिक जोमाने कार्य पुढे सुरू ठेवले पाहिजे. मिशनरी कार्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले कि देशातील पहिली शाळा मिशनऱ्यांनी काढली, शिक्षणाची द्वारे त्यांनी सर्वसामान्यांना खुले करून दिले. त्यानी कधीच जाती धर्माच्या आधारे भेदभाव केला नाही त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले. नीलिमा जाधव- बंडेलू यांनी आपल्या मानोगतात पुरस्काराबद्दल आभार व्यक्त करत अनेक ऐतिहासिक संदर्भ देत सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. कार्यक्रमाचे प्रास्तविक ॲड. संतोष गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन भैरवनाथ वाकळे यांनी केले. यावेळी युनूस तांबटकर, अशोक सब्बन, शिवाजी नाईकवाडी, सत्यशील शिंदे, कमलाकर देढे, ॲड. बेबी बोर्डे, प्रा. प्रियदर्शन बंडेलू, यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**समाजसेवेचा वारसा जपत सामाजिक क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, प्रशासकीय व मानवीहक्काच्या क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा जाधव- बंडेलू यांना यंदाचा ‘वारसा सावित्रीचा’ पुरस्कार २०२६ प्रदान करून कार्यगौरव करण्यात आला.**




# लोकशाही उत्सव

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६




अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर २००३ निरंतर नगरसेवा



## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक

### अनुभवाच्या जोरावर पुन्हा मैदानात

प्रभाग ७ साठी ठोस विकासाची भूमिका

प्रभाग क्रमांक सातमधून शिवसेना पक्षाच्या वतीने मी सारिका हनुमंत भुतकर पुन्हा एकदा नागरिकांसमोर उभी आहे. याआधी मला नगरसेविका म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि त्या काळात महानगरपालिकेच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला. त्यामुळे केवळ आश्वासने नव्हे, तर अनुभवाच्या जोरावर काम कसे करायचे हे मला माहीत आहे. मागील कार्यकाळात मी प्रभागातील सांडपाणी व्यवस्था, आरोग्य आणि नागरिकांचे आरोग्य शिक्षण या महत्त्वाच्या विषयांकडे विशेष लक्ष दिले. या कामांमुळे प्रभागातील अनेक मूलभूत समस्या मार्गी लागल्या, हे नागरिकांनी स्वतः अनुभवले आहे. म्हणूनच येत्या निवडणुकीत नागरिक माझ्या कामावर विश्वास ठेवून मला पुन्हा महानगरपालिकेत पाठवतील, याबाबत मला तीळमात्रही शंका नाही.

सोबत अर्जून तात्या बोरूडे, भैरवनाथ वाकळे आणि हनुमंत भुतकर यांच्या सारख्या ज्येष्ठांचे मार्गदर्शनही माझ्या सोबत आहे याचा मी नक्कीच प्रभागच्या विकासकामासाठी उपयोग करुन घेईल. आज प्रभागासमोर एक गंभीर प्रश्न उभा आहे, तो म्हणजे वाढती दहशत आणि गुंडगिरी. अलीकडच्या काळात या प्रकारांमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे चित्र बदलणे अत्यंत गरजेचे आहे. पुढील काळात या दहशतीचा ठोस बंदोबस्त करणे, हा माझा प्रमुख संकल्प असेल. त्याचबरोबर प्रभागातील गोरगरीब आणि सामान्य नागरिकांना महानगरपालिकेच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ कसा मिळेल, याकडे मी विशेष लक्ष देणार आहे. योजना कागदावर न राहता त्या घराघरात पोहोचल्या पाहिजेत, ही माझी स्पष्ट भूमिका आहे. प्रभाग क्रमांक सात हा शहरातील एक आदर्श, म्हणजेच मॉडेल प्रभाग व्हावा, यासाठी माझ्याकडे ठोस उपयोजना आहेत. अनुभव, कामाची तयारी आणि नागरिकांचा विश्वास याच्या बळावर प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा माझा निर्धार आहे.

**प्रभाग क्रमांक ७ क**
**सौ. सारिका हनुमंत भुतकर**
**मा. नगरसेविका शिवसेना**

# प्रभाग ७ मध्ये शिंदेंच्या शिवसनेचा झंझावाती प्रचार

## शक्तीप्रदर्शनासह घराघरात संपर्क





**यावेळी माजी विरोधी पक्षनेते बहिरनाथ वाकळे यांनीही प्रचारात सहभाग घेत आपली भूमिका मांडली. महानगरपालिकेने अलीकडच्या काळात घरपट्टी व नळपट्टीत मोठ्या प्रमाणात वाढ केली असून, त्यामागचे कारण माजी खासदार सुजय विखे यांच्या विळद घाट येथील हॉस्पिटल व कॉलेजेसना दिलेल्या करवाढीतील सवलती असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. भाजपाच्या नगरसेवकांच्या मदतीने ही सवलत देण्यात आली असून, त्याचा बोजा आता सामान्य नागरिकांवर टाकला जात असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आज जरी प्रचाराला सुरुवात झाली असली तरी प्रभागात दिवंगत आमदार अनिल भैय्या राठोड यांना मानणारा मोठा वर्ग आहे. आज आमच्याकडे धनुष्यबाण हे चिन्ह असून, प्रचारादरम्यान नागरिकांकडून अनिल भैय्या राठोड यांच्या आठवणी जागवल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

**तुषार सोनवणे । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला असून, मंगळवारी (४ जानेवारी) प्रभाग क्रमांक सातमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या वतीने प्रचाराचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. सुडके मळ्यातील गणेश मंदिरात नारळ वाढवून सेनेच्या उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार सारिका हनुमंत भुतकर, गोरख अर्जुन बोरुडे आणि धनंजय गोलवड हे उपस्थित होते. त्यांच्या सोबत मोठ्या संख्येने समर्थक व स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी तिन्ही उमेदवारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत परिसरात लक्षवेधी उपस्थिती नोंदवली. प्रचारादरम्यान उमेदवारांनी सुडके मळा, बोरुडे मळा, भुतकरवाडी, बालिकाश्रम रोड परिसरात मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. घराघरात जाऊन ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेत मतदारांना मतदानाचे आवाहन करण्यात आले. प्रचार फेरीत महिलांची उपस्थिती लक्षणीय होती, तर युवकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक ठिकाणी नागरिकांनी उमेदवारांचे औक्षण केले, तर काही ठिकाणी आपुलकीने विचारपूस करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रचाराच्या प्रारंभी शंकरराव सुडके, प्रकाश बोरुडे, मंजन सुडके, नंदकुमार सुडके, दीपक सुडके, रावसाहेब सुडके, गोरख तुकाराम बोरुडे, बाळासाहेब बोरुडे, अमोल बोरुडे, जालिंदर बोरुडे, किरण बोरुडे, अतुल राऊत, बाळासाहेब भुतकर, गणेश शिंदे, छबुराव वाकळे, लक्ष्मण शिंदे, मच्छिंद्र फुलसौंदर, शरद बोरुडे, संदीप बोरुडे, वैभव नेमाने, वैशाली तोडमल, उज्वला वाकळे, समृद्धी वाकळे, भूमिका थोरवे, वर्षा थोरवे, सूर्यभान गोलवड, पोपट गोलवड, अरुण गोलवड, सुभाष गोलवड, विजय गुंजाळ, अशोक बर्डे, रवी गोलवड, कैलास गोलवड, करण गुंजाळ, सागर अहिरे, गोरख बनकर, लिलाबाई माळी, संगीता गोलवड, भारती पवार, सविता बर्डे, मनीषा माळी, सुमन पवार, मंगल गुंजाळ आदी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विशाल गणपती मंदिरातून राष्ट्रवादीचा प्रचार श्रीगणेशा

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १३ मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिरात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी भाजपचे शहरजिल्हाध्यक्ष अनिल मोहिते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे अधिकृत उमेदवार सुरेश बनसोडे (अ), सुजाता पडळे, अनिता शेटिया (क) व अविनाश हरिभाऊ घुले (ड) यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात व गणपती बाप्पाच्या जयघोषात प्रचाराची सुरुवात करण्यात आली. महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. नागरिकांचा प्रतिसाद व कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता प्रभाग १३ मध्ये महायुतीला भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, अहिल्यानगरचा सर्वांगीण व समतोल विकास करण्याचा ठाम निर्धार महायुतीचा आहे. राज्यात आमचे सरकार असून गल्लीबोळांपासून ते प्रमुख रस्त्यांपर्यंत विकासकामे वेगाने सुरू आहेत. रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर कामे झाली आहेत. या विकास प्रक्रियेत नगरसेवकांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा असून आतापर्यंत महायुतीचे पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. जनतेचा विश्वास पाहता ही निवडणूक महायुतीच जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उमेदवार अविनाश हरिभाऊ घुले यांनी मनोगत व्यक्त करत सांगितले की, गेल्या पाच वर्षांत प्रभाग १३ मध्ये भरीव विकासकामे झाली असून प्रलंबित कामेही लवकर मार्गी लावली जातील. महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

# महापालिका निवडणुकीत बंडखोरीचा फटका

## भाजपचे चार, अजित पवार गटाचे दोन बंडखोर मैदानात


**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत अनेक पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी उफाळून आली असून बंडखोर उमेदवारांनी पक्षांसमोर अडचणी निर्माण केल्या आहेत.

भाजपमधील अनेक जुन्या पदाधिकाऱ्यांची उमेदवारी कापल्याने असंतोष निर्माण झाला. काहींनी माघार घेतली असली तरी नरेंद्र कुलकर्णी, सोनाली अजय चितळे, नितीन शेलार व मनीष साठे या चार जणांनी बंडखोरी कायम ठेवली आहे. अजित पवार गटामधून अमित खामकर व केतन क्षीरसागर यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. भाजपचे नरेंद्र कुलकर्णी हे माजी प्रांत कार्यकारिणी सदस्य तर अजय चितळे हे माजी मंडलाध्यक्ष असूनही पक्षाकडून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न झालेला नाही. याशिवाय मनसेच्या स्वाती विनोद काकडे व ठाकरे गटाचे हर्षवर्धन कोतकर यांनीही अपक्ष उमेदवारी स्वीकारली आहे. या बंडखोरीमुळे अनेक प्रभागांतील गणिते बदलली असून थेट लढतींचे चित्र गुंतागुंतीचे झाले आहे.

# ४०+ सेवा एकाच क्लिकवर, निवडणूक आयोगाकडून ECINet ॲप लाँच

**मुंबई । रयत समाचार**




भारत निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने विकसित करण्यात आलेले ECINet ॲप हे मतदार, उमेदवार, राजकीय पक्ष आणि निवडणूक यंत्रणेसाठी एक ऑल-इन-वन डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. आतापर्यंत वेगवेगळ्या ॲप्स व वेबसाइट्सवर उपलब्ध असलेल्या सेवा आता एकाच ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ॲपची ठळक वैशिष्ट्ये: ४० हून अधिक सेवा एकाच ॲपमध्ये Voter Helpline, cVIGIL, Saksham, Voter Turnout यांसारखी ४०+ स्वतंत्र ॲप्स/पोर्टल्स आता एका ठिकाणी, लाईव्ह व अद्ययावत माहिती, मतदानाची टक्केवारी, ट्रेंड्स आणि निवडणूक संबंधित आकडेवारी त्वरित उपलब्ध. पारदर्शक निवडणूक प्रक्रिया: मतदानानंतर अवघ्या ७२ तासांत Index Card प्रसिद्ध होणार (पूर्वी यासाठी आठवडे लागत होते). नागरिक सहभागाला प्रोत्साहन, ॲपमधील Submit a Suggestion पर्यायातून थेट सूचना देण्याची सुविधा. भारत निवडणूक आयोगाने नागरिकांना आवाहन केले आहे की त्यांनी Google Play Store किंवा Apple App Store वरून ECINet ॲप डाउनलोड करून वापरावे. ॲप अधिक प्रभावी व सोपे करण्यासाठी नागरिकांनी १० जानेवारीपर्यंत आपल्या सूचना ॲपमधील Submit a Suggestion या पर्यायाद्वारे नोंदवाव्यात. नागरिकांकडून मिळालेल्या सूचनांच्या आधारे या महिन्याच्या अखेरीस ECINet ॲपचा अधिकृत शुभारंभ करण्यात येणार आहे.

Google Play Store लिंक – https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.eci.app

# निष्ठावान शिवसैनिकांचे खच्चीकरण– ढोणे

## एबी फॉर्म न दिल्याने अपक्ष, पक्षांतर्गत षड्यंत्राचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात अंतर्गत गोंधळ उघडकीस आला असून, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जाणूनबुजून एबी फॉर्म न दिल्यामुळे आपली उमेदवारी अपक्ष ठरल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे कार्यकर्ते गौरव ढोणे यांनी केला. माजी आमदार स्व. अनिल राठोड यांचे निष्ठावान शिवसैनिक डावलून त्यांचे राजकीय खच्चीकरण करण्यासाठी कट रचण्यात आल्याचा दावा त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला. ढोणे यांनी सांगितले की, गेल्या आठ वर्षांपासून ते स्व. अनिल राठोड यांच्या नेतृत्वाखाली निष्ठेने पक्षकार्य करत आहेत. यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांनी पक्षाकडे अधिकृत उमेदवारीची मागणी केली होती. ता. २९ डिसेंबर रोजी रात्री शहरप्रमुख किरण काळे यांनी उमेदवारीबाबत विचारणा करत महाविकास आघाडीतील जागावाटप सुरू असून, आपल्यासाठी जागा मिळवली जाईल, असे आश्वासन दिल्याचे त्यांनी नमूद केले. शिवसेनेचा अधिकृत एबी फॉर्म सादर करण्याची अंतिम मुदत ३० डिसेंबर होती. त्या दिवशी महानगरपालिकेच्या जुन्या कार्यालयात आपण उपस्थित असताना सहकारी उमेदवारांना मनोज गुंदेजा यांनी स्वतः एबी फॉर्म दिले. मात्र, आपला एबी फॉर्म व कव्हर लेटर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा केला जाईल, असे सांगून आपली दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर वारंवार एबी फॉर्मची मागणी करूनही 'तुमचा फॉर्म आधीच जमा झाला आहे,' असे सांगत वेळकाढूपणा करण्यात आला. वेळ संपल्याने प्रशासनाने अर्ज स्वीकारले आणि एबी फॉर्म नसल्यामुळे आपली उमेदवारी अपक्ष म्हणून वैध ठरवण्यात आल्याचे ढोणे यांनी स्पष्ट केले. एबी फॉर्म प्रत्यक्ष न देता तो जमा केल्याचा खोटा दावा करण्यात आला. उमेदवारी अपक्ष ठरल्याचे कळल्यानंतर उशीर झाल्याचे सांगण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया जाणीवपूर्वक आखलेल्या कटाचा भाग असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकारामागे निष्ठावान शिवसैनिकांचे राजकीय अस्तित्व संपवण्याचा अजेंडा असल्याचेही त्यांनी नमूद केले. या सर्व घडामोडींची सविस्तर माहिती शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना लेखी स्वरूपात कळवण्यात आली असून, एबी फॉर्मअभावी अपक्ष ठरलेली उमेदवारी आपण मागे घेतल्याचा खुलासा गौरव ढोणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.




# रयत समाचार Classified छोटी जाहिरात

## छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# सातारा साहित्य संमेलनात ‘वाघोबाने अडविली वाट’ पुस्तकाचे प्रकाशन



**अकोले । सतीश पाचपुते**

सातारा येथे ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू आहे. या साहित्य संमेलनात अकोले येथील लेखक भाऊसाहेब कासार यांच्या वाघोबाने अडविली वाट या बालकथा संग्रहाचे प्रकाशन साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, प्रकाशन समिती सदस्य डॉ. केशव मोरे, बाळासाहेब तोरसेकर, आश्लेषा महाजन, प्राचार्य यशवंत पाटणे, घनश्याम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रकाशनप्रसंगी बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, लेखकांना उत्तेजन मिळावे म्हणून पुस्तक प्रकाशन कट्ट्याची संकल्पना राबविण्यात आली असून ही अभिनंदनीय बाब आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम आणि शिवाजीराव भोसले यांच्या साहित्यामुळे मराठी भाषा समृद्ध झाली. लेखकांनी आपल्या अनुभवांचे शहाणपण कागदावर उतरवावे, कोणी वाचेल की नाही याचा विचार करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला. लेखनातून संस्कृती समृद्ध होते. संस्कृतीचे चरित्र म्हणजे देशाचे व मानवतेचे चरित्र असून लेखक हे संस्कृतीचे शिल्पकार आणि नायक असतात. सध्याच्या काळात दुःख देणारी व्यवस्था निर्माण होत असताना साहित्यच आनंद देत असल्याने साहित्यनिर्मिती व त्याचा आस्वाद घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रकाशन कट्ट्यावरून शंभरहून अधिक पुस्तकांचे प्रकाशन होत असल्याबाबतही त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी बोलताना लेखक भाऊसाहेब कासार यांनी सांगितले की, सध्या महाराष्ट्रातील पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांत वाघोबा म्हणजेच बिबट्या मानवी वस्तीत येऊन पाळीव प्राणी व माणसांवर हल्ले करत असल्याच्या घटना वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर बिबट्या व मानव यांच्यातील संघर्षाचा विषय पकडत मनोरंजनातून प्रबोधन करणाऱ्या कथा या पुस्तकात मांडण्यात आल्या आहेत. पुस्तकाच्या मलपृष्ठावर साहित्यिक व व्याख्याते इंद्रजीत देशमुख यांनी ब्लर्ब लिहिला आहे. साहित्य संमेलनात पुस्तकाचे प्रकाशन होणे ही लेखकांसाठी अभिमानाची बाब मानली जाते. भाऊसाहेब कासार यांचे सातारा साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. विमानप्रवासाची गोष्ट, घडणारी शाळा, प्रवराकाठ (कवितासंग्रह) व मुलांच्या गोष्टी ही त्यांची अन्य पुस्तके असून विमानप्रवासाची गोष्ट या पुस्तकाचा A Flight Well Deserved या नावाने इंग्रजी अनुवादही प्रकाशित झाला आहे.



# क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे कार्य आजही समाजाला प्रेरणादायी– यशवंत पोटे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

समाजातील स्त्रीपुरुष विषमतेची दरी आजही पूर्णपणे कमी झालेली नाही. ही दरी कमी करण्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणादायी ठरत आहे, असे प्रतिपादन ॲड. यशवंत पोटे यांनी केले. लोखंडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजेंद्र खेडकर, ऋषिकेश बोरुडे, पल्लवी पोटे व कोमल बोरुडे यांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. ग्रामस्थ संतोष लोखंडे यांनी मनोगत व्यक्त करत शाळेतील वर्गखोलीचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व इतर समस्या उपस्थित केल्या. यावर नगरसेवक राजेंद्र खेडकर, पल्लवी पोटे, कोमल बोरुडे, ऋषिकेश बोरुडे तसेच पांडुरंग पोटे यांनी नगरपालिका स्तरावरून शक्य तेवढे सर्वतोपरी सहकार्य करण्याचे व प्रलंबित समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी राजेंद्र खेडकर यांनी शाळेची गरज ओळखून सुमारे आठ हजार रुपये किमतीचे कार्यालयीन कपाट तातडीने देण्याची घोषणा केली. कार्यक्रमास दत्तात्रय सुद्रिक, सोमनाथ शिर्के, सुदाम घोरपडे, कैलास लोखंडे, अण्णासाहेब पोटे, बाळासाहेब लोखंडे, संतोष मोटे, परशुराम शिर्के, सोमनाथ लोखंडे, बाळासाहेब मोटे, विलास लोखंडे, दादासाहेब कुसकर, जयसिंग सुद्रिक, सहशिक्षिका मंगल जाचक यांच्यासह पालक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डॉ. संदीप मोटे यांनी केले, तर आभार संतोष लोखंडे यांनी मानले.

**बाबासाहेब किसन लोखंडे यांनी यावेळी स्वत:ची तीन गुंठे जागा शाळेस बक्षीसपत्र करून देण्याची घोषणा केल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला शाळेच्या जागेचा प्रश्न मार्गी लागणार आहे. याबद्दल ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने बाबासाहेब लोखंडे यांचे ऋण व्यक्त करत त्यांचा सत्कार करण्यात आला.**

# राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ समितीत काका कोयटे यांची निवड



**कोपरगाव । किसन पवार**

केंद्र शासनाच्या सहकार खात्याने राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर केल्यानंतर, त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या सहकार कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने उच्चस्तरीय राज्यस्तरीय समितीची स्थापना केली आहे. या महत्त्वाच्या समितीवर महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तसेच कोपरगाव येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा कोयटे (काका कोयटे) यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमार्फत सहकारी पतसंस्थांच्या थकबाकी वसुलीविषयक कायद्यात प्रभावी बदल सुचविणे, थकबाकीदारांवर निर्बंध आणणे, वसुली प्रक्रिया अधिक गतिमान करणे तसेच पारदर्शकता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. यासोबतच सहकारी पतसंस्थांच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र निधीची तरतूद, ठेवींना विमा संरक्षण तसेच सिबिलच्या धर्तीवर ‘क्रॉस प्रणाली’ अनिवार्य करण्याबाबतचे प्रस्ताव समितीकडून मांडले जाणार आहेत. तसेच ‘सहकारांतर्गत सहकार’ ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविणे, महिला व युवकांचा सहकार चळवळीत सहभाग वाढविणे, विविध सहकारी संस्थांमधील समन्वय मजबूत करणे आणि अवसायनात निघालेल्या पतसंस्थांमधील ठेवीदारांना लवकर दिलासा देण्यासाठी आवश्यक कायदेशीर सुधारणा सुचविण्यावरही समितीचा भर असणार आहे. दरम्यान, सहकारी पतसंस्था चळवळीतील नागरिक, पदाधिकारी व सभासदांनी आपल्या सूचना, अडचणी व अपेक्षा लेखी स्वरूपात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनकडे सादर कराव्यात, असे आवाहन ओमप्रकाश कोयटे यांनी केले आहे.

# आबासाहेब काकडे विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**शेवगाव । नरहरी शहाणे**

आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर ता २ जानेवारी २०२६ रोजी पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. विद्याधर काकडे यांनी भूषविले. कार्यक्रमास माजी आमदार लहु कानडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



आपल्या भाषणात कानडे यांनी कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्याशी असलेले स्नेहबंध, त्यांनी शिक्षण क्षेत्रासाठी केलेले कार्य तसेच संस्थेच्या वाटचालीबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. ‘‘माझ्या जडणघडणीत तसेच मी आमदार होण्यामागे कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचा सिंहाचा वाटा आहे,’’ असे स्पष्ट करताना त्यांनी आमदार म्हणून मिळालेला निधी विकासकामांसाठी खर्च करताना जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक क्रांती घडवून आणण्यासाठी योग्य ठिकाणी वापरल्याचे नमूद केले. समाजासाठी आजही आपण लेखन करीत असल्याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात प्रसिद्ध भारुडकार हमिद सय्यद यांनी आपल्या प्रभावी भारुड सादरीकरणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रबोधन केले. जीवनातील आचार, विचार व वर्तन याबाबत त्यांनी सोप्या व बोलक्या भाषेत विचार मांडले. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच तालुक्याचे भूषण किंगरी वादक धर्मा कांबळे यांनी किंगरी वाद्याच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. पारंपरिक लोककलेच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. यावेळी पत्रकार तथा लोककला अभ्यासक भगवानराव सेने हेही उपस्थित होते.

या कार्यक्रमास एफडीएल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विद्याधर काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे तसेच आबासाहेब काकडे समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मणराव बिटाळ यांची उपस्थिती लाभली. विद्यालयात वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांत क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह स्वरूपात पारितोषिके प्रदान करण्यात आली. हा पारितोषिक वितरण सोहळा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी, संस्कारक्षम व शैक्षणिक मूल्यांची जपणूक करणारा ठरला.




# शांतिनिकेतन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक अभ्यास दौरा उत्साहात

**पारनेर । आबीद खान**

धोत्रे येथील शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी मधील प्रथम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी ता. २ जानेवारी रोजी शैक्षणिक ज्ञानाबरोबरच सामाजिक जाणीव वाढविण्याच्या उद्देशाने अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास दौऱ्यांतर्गत विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पास भेट दिली. येथे विविध औषधी वनस्पतींची लागवड, संवर्धन, प्रक्रिया तसेच औषध निर्मितीतील त्यांचा उपयोग याबाबत तज्ज्ञांकडून सखोल माहिती घेण्यात आली. फार्मसी शिक्षणाशी संबंधित प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक समृद्ध झाला. यानंतर विद्यार्थ्यांनी मनगाव येथील माऊली सेवा प्रतिष्ठान (घर आणि मन हरवलेल्या माणसांचे गाव), मु. पो. शिंगवे नाईक येथे भेट दिली. येथे मानसिक व सामाजिक आधार हरवलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना समाजातील दुर्लक्षित घटकांबाबत माहिती मिळाली तसेच सामाजिक भान, माणुसकी व सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित झाले. प्रतिष्ठानातील सेवाभावी कार्य, व्यवस्थापन पद्धती व पुनर्वसन प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले. या फील्ड व्हिजिटमुळे विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतींच्या शास्त्रीय उपयोगाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला, तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली. हा अभ्यास दौरा कॉलेजचे अध्यक्ष डॉ. प्रशांत शिंदे तसेच प्राध्यापक कांचन जाधव व शिवकन्या वणवे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# गोविंदराव आदिक जयंतीनिमित्त हृदयरोग तपासणी शिबिर



**श्रीरामपूर । शफीक बागवान**

माजी मंत्री स्व. गोविंदराव आदिक यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त उद्या मंगळवार, ता. ६ जानेवारी २०२६ रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती साई बाबा संस्थानच्या माजी विश्वस्त लोकनियुक्त माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक यांनी दिली. आदिक म्हणाल्या, साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपूर व महाराष्ट्र कृषक समाज यांच्या संयुक्त विद्यमाने हे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर गंगाधर ओगले साखर कामगार हॉस्पिटल श्रीरामपूर येथे सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत संपन्न होणार आहे. तत्पूर्वी नाव नोंदणी आवश्यक आहे. हृदय आरोग्याची काळजी घेण्यासाठी ही एक सुवर्णसंधी असून नागरिकांनी या शिबिराचा लाभ आपले आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आरोग्याची वेळेत तपासणी करून निरोगी राहा, असे आवाहन अनुराधा आदिक यांनी केले.

दरम्यान, नाव नोंदणीसाठी आदित्य आदिक, निरंजन भोसले, सोहेल शेख, गोपाल वायंदेशकर, अविनाश नागरे, अर्जुन आदिक, रंजन वाव्हळ, रोहीत घोरपडे, अनिरुद्ध भिंगरवाला यांच्याशी संपर्क साधावा असे ही आवाहन आदिक यांनी केले आहे.

# विश्वविनायक मल्टीस्टेटचा ५१ कोटींचा टप्पा पार

## शेवगाव शाखेत ठेवीदारांचा सत्कार व आनंदोत्सव

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

विश्वविनायक मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या बहुराज्य पतसंस्थेने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती करत ३१ डिसेंबर २०२५ अखेर एकूण ५१ कोटी रुपयांच्या व्यवसायाचा ऐतिहासिक टप्पा पार केला. या महत्त्वपूर्ण यशानिमित्त शेवगाव येथील शाखेत ठेवीदारांचा सत्कार समारंभ व आनंदोत्सव उत्साहात पार पडला. विश्वविनायक मल्टीस्टेट या संस्थेची स्थापना सन २०१८ मध्ये पाथर्डी येथील सुवर्णव्यवसायिक व सामाजिक जाणिवेचे नेतृत्व करणारे उद्योजक मोदक शहाणे यांच्या पुढाकारातून करण्यात आली.



स्थापनेपासूनच पारदर्शक कारभार, ठेवीदारांचा विश्वास, वेळेवर सेवा व सुरक्षित गुंतवणूक या मूल्यांवर आधारित कामकाज केल्यामुळे आज संस्थेच्या एकूण सहा शाखा यशस्वीपणे कार्यरत आहेत. ५१ कोटींचा व्यवसाय टप्पा पार केल्याच्या आनंदात शेवगाव शाखेत ठेवीदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक आशुतोष डहाळे, रोहित काथवटे, डॉ. नीरज लांडे, बंडूकाका रासने, प्यारेलालभाई शेख, बंडू निकम, सलीम जिलानी यांच्यासह संस्थेचे चेअरमन मोदक शहाणे तसेच मोठ्या संख्येने ठेवीदार महिला व पुरुष उपस्थित होते. बंडूकाका रासने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘आजच्या काळात पतसंस्थांवर लोकांचा विश्वास टिकवणे हे मोठे आव्हान आहे.

विश्वविनायक मल्टीस्टेटने अल्पावधीत जो विश्वास निर्माण केला आहे, तो त्यांच्या प्रामाणिक, पारदर्शक व ठेवीदाराभिमुख धोरणाचा परिणाम आहे. ठेवीदारांचा पैसा सुरक्षित राहील याची खात्री देणारी संस्था म्हणून विश्वविनायक मल्टीस्टेटचा नावलौकिक वाढत आहे.’’ डॉ. नीरज लांडे यांनी सांगितले की, ‘‘लघुउद्योजक, व्यापारी, स्वयंरोजगार करणारे युवक व महिला बचत गट यांना वेळेवर व सुलभ कर्ज उपलब्ध करून दिल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. विश्वविनायक मल्टीस्टेटने छोट्या-मोठ्या व्यवसायांसाठी कर्जपुरवठा वाढवावा, जेणेकरून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.’’ संस्थेचे चेअरमन मोदक शहाणे यांनी सांगितले की, ‘‘ठेवीदारांनी संस्थेकडे ठेवलेला प्रत्येक रुपया कुठे वापरला जातो व कसा गुंतवला जातो याबाबत प्रश्न विचारणे हा त्यांचा हक्क आहे. आमची संस्था पूर्णपणे पारदर्शक कारभारावर विश्वास ठेवते.

ठेवीदारांचा पैसा सर्वस्वी सुरक्षित असून, ठेवीदाराने गुंतवणूक केलेल्या रकमेपेक्षा अधिक सोनेतारण कर्ज वितरित केली जाते. भविष्यातही आधुनिक सेवा, विविध कर्ज सुविधा व डिजिटल बँकिंगसदृश सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.’’ ५१ कोटींचा टप्पा हा केवळ आर्थिक आकडा नसून, तो ठेवीदारांचा विश्वास, कर्मचाऱ्यांची मेहनत व व्यवस्थापनाची दूरदृष्टी यांचे प्रतीक असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी केले.




# कानगाव शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दौंड । रयत समाचार**

जि. प. प्राथमिक शाळा, कानगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अर्थात 'बालिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध वेशभूषांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण कोऱ्हाळे व शाळेचे मुख्याध्यापक संजय गवळी यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती देत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संध्या कुंभार यांनी केले, तर श्याम ठाणेदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन उपशिक्षक राजेंद्र जगताप यांनी केले, तर आभार हराळ यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रकाश लकडे व सखाराम खोमणे यांनी केले. या कार्यक्रमास पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# संत भगवानबाबा पुण्यतिथी महोत्सव

## भगवानगडावर भाविकांचा जनसागर

**पाथर्डी । नितीन गटाणी**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे दैवत असलेल्या श्री संत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री क्षेत्र भगवानगड येथे भव्य-दिव्य पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला.

या सोहळ्यासाठी भगवानगडावर भव्य मंडप उभारण्यात आला होता. भाविकांसाठी सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच वाहनांच्या पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी विविध संस्थानांतून व गावांतून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर दाखल झाल्या होत्या. मठाधिपती हभप न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यक्रमांचे नियोजन व देखरेख अत्यंत काटेकोरपणे करण्यात आली होती. काल सकाळी ९ वाजता श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा संपन्न झाली. दुपारी १२ वाजता डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून पुण्यतिथी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी महंत शास्त्री यांनी भाविकांसमवेत स्वतः स्टेजवर बसून श्री संत भगवानबाबांच्या पुण्यतिथीचा प्रसाद स्वीकारला. पुण्यतिथी सोहळ्यासाठी जमलेल्या लाखो भाविकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था, संभाव्य चोरट्यांपासून महिलांची सुरक्षितता तसेच इतर सुयोग्य व्यवस्थापनासाठी घोगस पारगाव, भारजवाडी, भालगाव व एकनाथवाडी येथील स्वयंसेवकांनी पोलीस प्रशासनास मोलाचे सहकार्य केले.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**बेलापूर । सलीमखान पठाण**

श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर खुर्द येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवर व ग्रामस्थांनी उपस्थित राहून अभिवादन केले.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या बेलापूर खुर्द शाखेच्या वतीने व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून ग्रामपंचायत कार्यालयासमोर सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच प्रणाली भगत, नयना बडदे, राहुरी कारखान्याचे माजी संचालक द्वारकानाथ बडदे, शशिकांत पुजारी, भाऊसाहेब पुजारी, विनय भगत, डॉ. रमेश गाडेकर, ॲड. दीपक बारहाते, दिलीप भगत, विजय भगत, बाळासाहेब जोशी, रामनाथ पुजारी, रामदास बडदे, अशोक जोशी, ज्ञानदेव महाडिक, धनंजय हरदास, निलेश हरदास, निलेश बडदे, राकेश बडदे, अनिल पुजारी, अशोक बारहाते, फकीरचंद महाडिक आदी मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# डोके शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने नववर्षाचे स्वागत

**अहमदनगर । विजय मते**

निर्मलनगर येथील लक्ष्मीबाई शांताराम डोके शाळेत सर्व विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. तसेच संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर, ग्रामस्वच्छता अभियान व विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या डॉ. ऋतुजा रणदिवे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आदिती पाटोळे, डॉ. रजत येवले, परिचारिका स्वाती कांबळे, पॅथॉलॉजिस्ट डॉ. सना सय्यद, आशा सेविका वैशाली धनवडे, चंद्रकला धनवडे, वर्षा महामुनी, योगिता ढवण व अफसाना शेख उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. रणदिवे यांनी विद्यार्थ्यांनी सकस आहार घ्यावा, मोबाईलचा अतिवापर टाळून मैदानी खेळ खेळावेत, तसेच नियमित व्यायामाचे महत्त्व पटवून दिले. स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी शाळेच्या आसपासचा परिसर स्वच्छ करून ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्याचप्रमाणे लंगडी, खो-खो, कबड्डी, वैयक्तिक धावणे अशा विविध शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे यांनी केले. प्रास्ताविक साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी केले, तर सूत्रसंचलन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. कार्यक्रमास सांस्कृतिक विभागप्रमुख ज्योती पवार, मंजू नवगिरे, आशा धामणे, संज्योत बर्वे, सुजाता कर्डिले, राणी राऊत, सुप्रिया वाळके, भरत जगदाळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**पाथर्डी । नितीन गटाणी**

संतश्रेष्ठ सावता महाराज मंदिर, कसबा पेठ येथे भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांची १९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणप्रसारासाठी भोगलेले अपमान, शेण व दगडांचा मारा सहन करूनही मुलींच्या शिक्षणासाठी केलेले संघर्षपूर्ण कार्य, त्यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान तसेच सार्वजनिक जीवनातील कार्य यांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सावता महाराज मंदिर ट्रस्ट, महात्मा फुले मंडळ, महिला टाळपथक, पुण्यतिथी उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच समाजातील महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भोकर येथे सावित्रीमाई फुले जयंती उत्साहात साजरी

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

तालुक्यातील भोकर येथे ठिकठिकाणी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील विविध प्रमुख ठिकाणी मान्यवरांनी सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. भोकर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच शितल पटारे, उपसरपंच गिरीष मते, भाजपाचे भाऊराव सुडके व काँग्रेस सेवा दलाचे तालुकाध्यक्ष सुदाम पटारे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

भोकर सोसायटी कार्यालयातील स्व. माजी आ. जयंतराव ससाणे सभागृहात माजी उपाध्यक्ष पुंजाहरी शिंदे, चेअरमन कारभारी तागड, माजी चेअरमन महेश पटारे, बाळासाहेब विधाटे, आण्णासाहेब काळे, सागर शिंदे व समता परिषदेचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत झुरंगे यांच्या हस्ते जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा परिषद सेमी इंग्लिश स्कूल येथे मुख्याध्यापक कचेश्वर जठार, तर श्री जगदंबा प्रसादिक विद्यालय येथे मुख्याध्यापक केशव जाधव व पर्यवेक्षक राजेंद्र आदमाने यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच जगतापवस्ती, वडजाई वस्ती, गिरमे-चौधरी वस्ती व हनुमानवाडी येथील शाळांमध्येही सावित्रीमाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी नामदेव चव्हाण, संदिप गांधले, काळू गायकवाड, मयूर काळे, ज्ञानेश्वर काळे, सागर आहेर, सुनिल विधाटे, वेणुनाथ डुकरे, रिपाईचे सुरेश अमोलिक, इंद्रभान दिवटे, भाजपा ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष भाऊराव सुडके, एकनाथ लोखंडे, भाऊसाहेब पटारे, दिलीप पटारे, भिकाजी पोखरकर, सुरेश माळवदे आदी मान्यवर उपस्थित होते.



# बाणेश्वर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथे श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेच्या श्री बाणेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बुऱ्हाननगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समाजसेवा, श्रमसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळणार आहे.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून ग्रामपंचायत सरपंच रुपाली कदम उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय जाधव यांनी स्वागतपर भाषणात एनएसएसच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत, ही योजना विद्यार्थ्यांना समाजाशी जोडणारी व राष्ट्रीय एकतेची भावना वृद्धिंगत करणारी असल्याचे सांगितले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. सागर कोहक यांनी शिबिराच्या नियोजनाची माहिती देताना श्रमदान, स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागृती, पथनाट्य तसेच व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा असे विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे सांगितले.


या शिबिरात महाविद्यालयातील ५० हून अधिक स्वयंसेवक सहभागी होत आहेत. उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे विश्वस्त, शिक्षकवृंद व गावातील मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी सहकार्याचे आश्वासन दिले. यावेळी उपसरपंच जालिंदर कदम, तंटामुक्ती अध्यक्ष इंद्रभान कदम, गोरक्षनाथ ट्रस्टचे अध्यक्ष शंकरराव कदम, डोंगरगनचे उपसरपंच संतोष पठारे, ग्रामविकास अधिकारी सारिका वाळुंज यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थित ग्रामस्थांना प्लास्टिकच्या वापरास आळा घालण्यासाठी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

## विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'स्वातंत्र्याचा पहिला श्वास' महानाट्य सादर

# स्नेहसंमेलनातून उभा केला स्वातंत्र्याचा जाज्वल्य इतिहास

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

या वर्षी पाथर्डी येथील श्री तिलोक जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वातंत्र्याचा पहिला श्वास हे महानाट्य सादर करण्यात आले. या स्नेहसंमेलनातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा जाज्वल्य इतिहास अतिशय प्रभावीपणे सादर करण्यात आला.



विद्यालयात चालवल्या जाणाऱ्या आनंद संगीत अकादमीच्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा अभिनय, नृत्य, तबलावादन व सिंथेसायझरवादन कलाविष्कारांच्या सुरेख मांडणीतून निर्माण झालेल्या या कलाकृतीच्या माध्ययमातून विद्यार्थ्यांनी १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षांच्या स्वातंत्र्यसंघर्षाचा रोमांचक इतिहास रंगभूमीवर उभा केला. पाथर्डी नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी, प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक विलास पुजारी, संस्थेचे खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ. ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, डॉ. अभय भंडारी, डॉ. सचिन गांधी, चांदमल देसरडा आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. मंगल पांडे यांच्या ऐतिहासिक बंडाने सुरू झालेल्या या महानाट्यात, चाफेकर बंधूंनी कमिशनर रँड यांच्या केलेल्या वधाचा धाडसी प्रसंग, जालियनवाला बाग हत्याकांड, इंग्रज सैन्याच्या लाठीमारात झालेली लाला लजपत राय यांची क्रूर हत्या, समस्त हिंदी असंतोषाला जागवणारी लोकमान्य टिळकांची "स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच !" ही प्रतिज्ञा, शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या अमर बलिदानाचे हृदयविदारक दृश्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, गोलमेज परिषदेतील स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीमागील दूरदृष्टीपूर्ण भूमिका, महात्मा गांधीजींचे स्वदेशी आंदोलन, असहकार चळवळ, मिठाचा सत्याग्रह, झाशीच्या राणीचा एकाकी संघर्ष, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आजाद हिंद सेनेची स्फूर्तिदायी हाक, अशा अनेक ऐतिहासिक घटना कालानुक्रमाने अत्यंत प्रभावीपणे सादर करण्यात आल्या. दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या या महानाट्यात शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू आणि महात्मा गांधीजींसारख्या हुतात्म्यांच्या अंतिम क्षणांच्या अनेक हृदयद्रावक प्रसंगांची प्रत्यक्ष अनुभूतीच विद्यार्थ्यांना व प्रेक्षकांना मिळाली. समस्त भारतीयांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळवलेले स्वातंत्र्य हे सहज मिळालेले नव्हते.

ते केवळ सत्तेचे हस्तांतरण देखील नव्हते, तर नव्वद वर्षांच्या अविरत संघर्षाची, अनेक ज्ञात अज्ञात हुतात्म्यांच्या बलिदानाची ती फलश्रुति होती. यादिवशी भारतीय नागरिक इंग्रजांच्या, राजे-महाराजांच्या, गुलामगिरीतून बाहेर पडले आणि खऱ्या अर्थाने मुक्त झाले. स्वतः देशाचे मालक बनले. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर आधारित नवी आदर्श समाजरचना भारतीयांनी स्वीकारली. म्हणून प्रत्येक भारतीयाने हे अनमोल स्वातंत्र्य व ही लोकशाही प्राणपणाने जपली पाहिजे.

हा प्रेरणादायी संदेश या महानाट्याने प्रभावीपणे पोहोचवला. संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांच्या संकल्पनेतून हे स्नेहसंमेलन साकारले गेले. महेश खताळ यांनी या महानाट्याचे लेखन केले. नाना मोरे यांनी दिग्दर्शन केले, तर प्रा. सूर्यकांत काळोखे व प्रा. सुनील मरकड यांनी या भव्य निर्मितीसाठी अथक परिश्रम घेतले. संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी प्रस्ताविक केले, सुनील कटारिया यांनी सूत्रसंचालन केले तर प्राचार्य अजय भंडारी यांनी आभार प्रदर्शन केले. समस्त पाथर्डीकरांनी या कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला. केवळ मनोरंजन नव्हे, तर भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेल्या नितीमूल्यांची ज्योत नव्या पिढीत प्रज्वलित करणारा एक स्तुत्य उपक्रम स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने संस्थेच्यावतीने राबवला गेला, अशी चर्चा या निमित्ताने पालक वर्गातून उमटली.